**महत्वाचे**

**कालमर्यादीत** **संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती.**

क्रमांक:संगाबाअवि/८/सी-१७३६/२०१७
दिनांक: १३.०९.२०१७

प्रति,
प्राचार्य,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालये.

**विषय :- उशिरा प्रवेशाबाबत... सत्र २०१७-२०१८**
संदर्भ :- विद्यापीठ पत्र क्र.संगाबाअवि/८/सी-१६७४/२०१७, दि. ०४.०९.२०१७

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, मा.कुलगुरुंचे अधिकारामध्ये **दि. ६ सप्टेंबर, २०१७ पर्यंत** महाविद्यालयाने गुणवत्तेनुसार प्रवेश करुन **दि.७ सप्टेंबर,२०१७ पर्यंत** उशिरा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नावाची वर्गनिहाय यादी प्राचार्यांच्या शिफारशीसह व स्वाक्षरीनिशी "दोन प्रतीमध्ये" मा.कुलगुरुंच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करुन त्याची एक प्रत नामांकनासाठी परीक्षा विभागामध्ये सादर करण्याबाबत संदर्भीय विद्यापीठ पत्रान्वये कळविण्यात आले होते.

मार्च २०१६ मध्ये झालेल्या १२ वी च्या परीक्षेचा निकाल मोठया प्रमाणात लागला असल्यामुळे तसेच इयत्ता १२ वी च्या पुरवणी परीक्षेचा निकाल लागल्याने विद्यार्थी प्रवेशापासून वंचीत राहु नये म्हणून आणि महाराष्ट्र शासनाने दि.३१.८.२०१७ च्या पत्रान्वये सन २०१७-१८ करीता अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांना जलदगती पध्दतीने अतिरीक्त तुकड्यांना परवानगी दिलेली असल्यामुळे, मा.कुलगुरुंनी विद्या परिषदेच्या पक्षात १२(७) अंतर्गत कार्यवाही करुन **दि. २९ सप्टेंबर, २०१७ पर्यंत** विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मुदत वाढ दिलेली आहे.

आपणांस कळविण्यात येते की, **दि.२९ सप्टेंबर, २०१७ पर्यंत** गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांचे प्रवेश करुन **दि.३ ऑक्टोबर,२०१७ पर्यंत** उशिरा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नावाची वर्गनिहाय यादी प्राचार्यांच्या शिफारशीसह व स्वाक्षरीनिशी "दोन प्रतीमध्ये" मा.कुलगुरुंच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करुन त्याची एक प्रत नामांकनासाठी परीक्षा विभागामध्ये सादर करावी.

**सर्व महाविद्यालयांनी वरील सुचनेचे काटेकोरपणे पालन करुन प्रवेशाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.**

**ज्या अभ्यासक्रमांची शासनाद्वारा CET परीक्षा घेण्यात आलेली आहे. त्या अभ्यासक्रमाबाबत शासन निर्णयानुसार प्रवेशासंबंधीची कार्यवाही होईल.**

आदेशान्वये.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव (म.वि.)
संत गाडगे बाबा अरावती विद्यापीठ,
अमरावती.

**प्रतिलीपी माहीती व योग्य त्या कार्यवाहीस्तव:-**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.